वाङ्ग ८

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

वाचाः १. जा.क्र. बीईए/सु.आ.प्र.यो./शिक्षकेत्तर/०१/२०२३/२७०१, दि. ०१.०१.२०२४
२. वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक, क्र. वेतन ११११/प्र.क्र.०८/सेवा ३, दि. ०९.१२.२०१६.
३. वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक, क्र. वेतन ११११/प्र.क्र.०८/सेवा ३, दि. ११.०५.२०१७.

## शुध्दीपत्रक

<u>जा.क्र. बीईए/सु.आ.प्र.यो./शिक्षकेत्तर/०१/२०२३/3067</u> <u>दि. ०१ फेब्रुवारी, २०२४</u>

विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना उपरोक्त संदर्भ क्र. १ मध्ये नमुद विद्यापीठ आदेशाव्दारे "सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना" लागु करण्यात आली आहे. सदर आदेशाचे परिच्छेद १ मधील **"तथापी सदंर्भ क्र. ८ मध्ये नमुद वित्त विभाग, शासन निर्णयानुसार दि.०१.१०.२००६ ते दि.३१.०३.२०१० या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय नाही."** हे वाक्य वगळुन त्याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

"वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. वेतन ११११/प्र.क्र.०८/सेवा-३, दि. ०९.१२.२०१६ नुसार जे कर्मचारी/अधिकारी हे दिनांक ०१.१०.२००६ ते दि. ३१.०३.२०१० या दरम्यान सेवेतुन सेवानिवृत्त झाले आहेत अथवा ज्यांचे सेवेत कार्यरत असतांना सदर कालावधी दरम्यान निधन झाले आहे, त्यांच्याकडुन सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजुरी बाबतच्या अटींची पुर्तता झाल्यानंतर त्यांना वेतन निश्चितीचा प्रत्यक्ष लाभ हा फक्त निवृत्तीवेतन विषयक/कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभांकरीताच म्हणजे निवृत्ती वेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन, सेवानिवृत्ती उपदान/मृत्यु उपदान तसेच रजा रोखीकरण, या लाभांच्या प्रयोजनार्थ अनुज्ञेय राहील.

तसेच वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. वेतन ११११/प्र.क्र.०८/सेवा-३, दि. ११.०५.२०१७ नुसार दि.०१.१०.२००६ ते दि. ३१.०३.२०१० या कालावधीमध्ये निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग दिनांक ०९.१२.२०१६ च्या अनुषंगाने, दुसरा लाभ मंजुरीची तारीख ते त्यांच्या सेवानिवृत्तीची तारीख या कालावधीसाठी काल्पनीक वेतन निश्चितीकरून या काल्पनिक वेतन निश्चितीच्या आधारे त्यांना उपदान, रजा रोखीकरण, सुधारीत अंशराशीकरण यांच्या फरकाच्या रकमा मंजुर करणे आवश्यक आहे मात्र त्यांच्या सेवानिवृत्तीची तारीख ते दि. ३१.०३.२०१० या कालावधीसाठी त्यांना निवृत्तीवेतनाची थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही. परंतु त्यांना दि. ०१.०४.२०१० पासून सुधारीत निवृत्तीवेतन व त्याबाबतची थकबाकी अनुज्ञेय राहील."

उपरोक्त शुध्दीपत्रक विद्यापीठाचे वित्त विभागाचे सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे.

..२

जा.क्र. बीईए/सु.आ.प्र.यो./शिक्षकेत्तर/०१/२०२३/3067 दि. ०१ फेब्रुवारी, २०२४

संदर्भीय शासन निर्णयानुसार सर्व कार्यालय प्रमुख यांनी सदर योजनेस पात्र कर्मचा-यांचे प्रस्ताव विशेष दुतामार्फत उपकुलसचिव (आस्था.) या कार्यालयास दि. ०९ फेब्रुवारी, २०२४ पर्यत न चुकता सादर करावे.

मा. कुलगुरूंचे मंजुरीने व आदेशानुसार.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रतिलीपीः-

१. अधिष्ठाता (सर्व)..........................................................................................
२. सहयोगी अधिष्ठाता (सर्व).............................................................................
३. संचालक संशोधन/विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
४. विभाग प्रमुख (सर्व).......................................................................................
५. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, (सर्व)......................................................................
६. सहयोगी प्राध्यापक रा.कृ.सं.प्र. (सर्व)...............................................................
७. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, (सर्व)..................................................................
८. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, (सर्व)....................................................
९. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
१०. प्राचार्य, श्री. शिवाजी कृषि महाविद्यालय, अमरावती/आनंदनिकेतन कृषि महाविद्यालय, वरोरा/जनता कृषि महाविद्यालय, अमरावती/ग्रामीन शिक्षण संस्था, वर्धा/अमरावती.
११. अधिदान व लेखाधिकारी, अकोला/नागपुर
१२. मा. कुलगुरू/कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरू/कुलसचिव यांचे माहितीकरीता.
१३. प्रभारी अधिकारी, विद्यापीठ संगणक कक्ष, अकोला यांना विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास्तव
१४. ...........................................................................................................

कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला